|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet Containing Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

आपली आहे प्रगती

# वाटचाल

* वर्ष १५ वे, अंक ४ * दि. १५ डिसेंबर २०१५ *
website : www.deodharmandal.org



**Self Portrait – First Monsoon Rain, 2011, Oil on Canvas, 16" x 20"**

## व्यक्तिविशेष –
# मेघना जयंत देवधर



यंदाच्या वाटचालच्या मुखपृष्ठावर व कव्हरवरील इतर पानांवर असलेली चित्रे आहेत आपल्याच एका कुलभगिनीची. चित्रकार आहे, मेघना जयंत देवधर. त्याचा जन्म १९८२ सालचा पुण्याचा. पुणे येथेच पदवी परीक्षेपर्यंतचे शिक्षण घेतल्यावर सन २००४ साली त्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमधील उच्चशिक्षणासाठी त्या अमेरिकेत रवाना झाल्या.

त्यांनी Austin मधील University of Texas मधून Electrical and Computer Engineering विषयात PhD प्राप्त केली. याच युनिर्व्हसिटीमधून त्यांनी ऑईल पेंटिंगचेही विशेष प्रशिक्षण घेतले. सध्या त्या University of California at Berkeley Extension मधून पोस्टग्रॅज्युएशन करीत आहेत.

कॅलिफोर्नियाच्या विविध भागांमध्ये त्यांच्या चित्रांची प्रदर्शने झाली आहेत.

केवळ एक ईमेल पाठवून चित्रे वाटचालमध्ये छापण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्वरित होकार कळविल्याबद्दल त्यांना धन्यवाद!

---




मंडळाच्या सभेस उपस्थित कार्यकारिणी सदस्य

गिरगांव येथे झालेल्या आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभेचे यजमानपद कार्यवाह सौ. सरिता देवधर यांनी स्वीकारले होते.
श्री. मुकुंद व सौ. सरिता या दांपत्याचे अध्यक्ष श्री. पु. गो. देवधर यांनी त्यांचे आभार मानले

## अध्यक्षांचे मनोगत

# स्वप्न

स्वप्न पाहणे चांगले की वाईट? स्वप्न पडणे म्हणजे झोप शांत न लागणे, असे म्हटले जाते. स्वप्नांत आपण अजब दुनिया पाहतो. अशक्य ते शक्य स्वप्नांत होऊ शकते. काही स्वप्ने ही निरर्थक असतात व झोपेतून जागे होताच विसरली जातात. पण पहाटे, पहाटे पडलेली स्वप्ने खरी होतात असे म्हणतात. स्वप्नांतील मृत्यू माणसाचे आयुष्य वाढवितो तर जेवणाच्या पंगती दु:खाची वार्ता आणतात असे समजतात.

''मनी वसे ते स्वप्नी दिसे'' अशी म्हण आहे. माणूस जो विचार मनांत नेहमी करीत असतो तो प्रत्यक्षांत आल्याचे त्याला स्वप्नात दिसते. भले ते प्रत्यक्ष होणे शक्य नसले तरी. आपण जी इच्छा करतो ती आपण स्वप्नात पूर्ण झालेली पाहतो. आपल्याला सुवर्णपदक मिळाले, लॉटरीचे एक कोटीचे बक्षीस आपल्याला लागले. आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याचा स्वीकार झाल्याचा पाहतो.

स्वप्न पाहणे चुकीचे नाही, पण स्वप्न जी वास्तवात उतरू शकतात ती पाहणे फार चांगले. मग त्या स्वप्नांचा पाठलाग करणे, ती सत्यांत आणण्याचा विचार करणे, त्याप्रमाणे योजना आखणे व ती योजना अमलात आणणे गरजेचे आहे. ज्यावेळी १९४७ साली भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी आपण अन्नधान्य आयात करीत होतो. अमेरिकेतून''PL480''योजनेप्रमाणे भारतास गहू येत असे. हा लाल गहू ते जो गुरांना खायला टाकत असत तो भारतात रुपयात देण्यात येत असे.

भारतास अन्नधान्यांत स्वयंपूर्ण करण्याचे स्वप्न आपले पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांनी पाहिले. पंचवार्षिक योजना आखल्या. अनेक धरणे बांधून शेतीस पाणी पुरेल अशी योजना केली. त्यावेळी अन्नधान्न खुल्या बाजारात मिळत नसे. रेशनवर सर्व काही. पाव सुद्धा रेशनवर होते. पण हरितक्रांती झाली व २५-३० वर्षांनी भारत अन्नधान्य निर्यात करू लागला. यालाच दूरदृष्टी (व्हिजन) म्हणतात.

आता पंतप्रधान मोदींनी जनतेस ''अच्छे दिन'' ची स्वप्ने दाखविली आहे. त्याप्रमाणे योजनाबद्ध कार्यक्रम सुरू केला आहे. परदेशातील उद्योगांना भारतात निवेश करून ''मेक इन इंडिया'' चा नारा दिला. भारतात उद्योग वाढले की नोकऱ्या वाढून बेकारी कमी होऊन, परकीय चलनाची गंगाजळी वाढेल. रुपयाची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत वाढेल. यासाठी त्यांना खूप देशांच्या भेटी घ्याव्या लागल्या. विरोधी पक्षांनी यावर टिका केली. त्याचे फलित दिसण्यास काही काळ जावा लागेल. पण विरोधी पक्षांना इतका वेळ थांबायचे नाही.''पी हळद हो गोरी'' असे होत नसते.

माजी राष्ट्रपती कै. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना २०२० मध्ये भारत एक समर्थ राष्ट्र, प्रगत राष्ट्र झालेला पाहावयाचा होता. त्यांना खात्री होती की ''भारत हे करू शकतो.'' जगात सर्वात जास्त तरुण भारतांत आहेत व ते हे उज्ज्वल भवितव्य साध्य करू शकतात. फक्त त्यांना राष्ट्रप्रेमाने भारणे आवश्यक आहे. त्यासाठी मोदींसारख्या आदर्श नेता जो निस्वार्थ बुद्धीने देशाचा गाडा हाकेल अशाची गरज आहे.

शेखचिल्ली सारखे दिवास्वप्न पाहून स्वत:चाच नाश करणारे नेते काय उपयोगाचे?

शेखचिल्लीने काच सामानाचा धंदा केला. दिवसभर तो घरोघरी जाऊन विक्री करावयाचा. एकदा दुपारी झाडाखाली बसून न्याहारी करून तो

(..... पान ५ वर

# देवधर मंडळ कार्यकारिणी (१/४/२०१३ ते ३१/३/२०१६)

**अध्यक्ष**
**पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३६०)
ब्लॉक नं. २, भागीरथी टॉवर्स, स.नं. ६, हि. नं. ११,
कोकण एक्सप्रेस, हॉटेल लेन, कोथरुड पुणे-४११०३८
दूरध्वनी- ९८६०३०६३४४, ०२०/२५४५६७५०
e-mail : pgdeodhar@gmail.com

**उपाध्यक्ष**
**वासुदेव नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४९७)
सी-३/१०२, सॅटेलाईट क्लासिक, जुने सी. एस. सी. कंपाऊंड,
गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०
दूरध्वनी २८२६१०२८,२८२४६०४२

**सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान. २१)
१०२, आय् विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित)
बाभई, बोरीवली (प.), मुंबई-४०००९१
दूरध्वनी : ०२२/२८९८१८५६
e-mail : suresh.deodhar@gmail.com

**कार्यवाह**
**सौ. सरिता मुकुंद देवधर** (कु.वृ.पान ३५९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगावकर बिल्डिंग नं. ६,
गिरगाव, मुंबई-४००००४ दूरध्वनी ०२२/२३८५४८११
मोबाईल : ९८२०६५९४४७

**सहकार्यवाह**
**विजय गंगाधर देवधर**
(पुणे विभाग कार्यवाह)
गौरी शंकर, १४ गोवर्धन सोसायटी, वीर सावरकर नगर,
पुणे-४११०३७. दूरध्वनी :०२०-२४२६४०३२, ८३०८८०५८९५
e-mail : deodharvg@yahoo.co.in

**कोषाध्यक्ष**
**अकल्पिता चिंतामणी देवधर** (कु. वृ. पान. ८९८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गांवदेवी चौक, कल्याण
मोबाइल : ९८२०३५६४१३
e-mail : cdakalpita@yahoo.co.in

**सहकोषाध्यक्ष (स्वीकृत)**
**नितेश नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४७३)
फ्लॅट नं. १२, भारत सावली अपार्ट.२ रा मजला, कल्पतरु टॉवर
समोर, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.)
मोबाइल : ९००४१९८९०३
e-mail : nitesh.devdhar@gmail.com

**वाटचाल (स्वीकृत)**
**आशिष राम देवधर** (कु. वृ. पान. ३१)
अतिथी संपादक, वाटचाल
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका,
कल्याण (प.) ४२१३०१ दूरध्वनी : ०९८३३५११५९३
e-mail : ashish.ram.deodhar@gmail.com

**सभासद**
**मधुसूदन दत्तात्रेय देवधर** (कु.वृ.पान ५३१)
११५२,'राधाकृष्ण' सुभाष नगर, १ ली गल्ली, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२, दूरध्वनी ०२०-२४४७८१६०

**हेमंत यशवंत देवधर** (कु. वृ. पान. ३१७)
श्री. विवेकानंद को. ऑप. हौ. सोसा., बिल्डिंग नं. १६, ब्लॉक नं.
२, तळमजला, गुरुमंदिरासमोर, सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.)
मोबाइल : ९८३३००७०६४
e-mail : hemant3232@rediffmail.com

**नरेश कृष्णाजी दीक्षित** (कु. वृ. पान. ७२५)
ब ९, ॐ भैरवी सोसा., सम्राट हॉटेल बिल्डिंग,
पं. दीनदयाल मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२
फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२
e-mail : nareshdixit1949@gmail.com

**डॉ. सुनिल गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर,
नाशिक रोड, नाशिक ४२२१०१. फोन : (०२५३)२४६४७८०
मोबाईल : ९८५०६५४२५०
e-mail : deodharsunil@rediffmail.com

**अविनाश दिवाकर देवधर (स्वीकृत)** (कु. वृ. पान. ९६७)
२, लक्ष्मी विनायक सोसा., मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली, पाथर्ली,
डोंबिवली (पूर्व) दूरध्वनी ०२५१-२४४५२६२
मोबाइल : ९२२४२६४९६९
e-mail : avinash.deodhar@gmail.com

**रविश देवधर (स्वीकृत)** (कु. वृ. पान. २०२)
ब्लॉक नं. २, आर्य अपार्ट., तळमजला, मराठी शाळेच्या मागे,
पोस्ट - रावतळे, चिपळूण, रत्नागिरी-४१५६०५
दूरध्वनी : ९४२११८९४३५०

**विशेष निमंत्रित**
**रवींद्र प्रभाकर देवधर** (कु. वृ. पान. २०८)
एच १०३, इंटरनिटी को.हौ.सो. इंटरनिटी मॉल शेजारी, तीन हात
नाका, ठाणे (प.) ४००६०४ मोबाइल :९८२०२८४१८३
e-mail : ravi_deo@hotmail.com

**पदसिद्ध सभासद**
**नारायण(दिलीप)गोविंद देवधर** (कु.वृ.पान ४१८)
बी-१०३ RNA हाईटस्, जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्ग
(लिंक रोड),अंधेरी, मुंबई-४०००९३.
दूरध्वनी: ०२२/२८२५२१४५ मोबाईल : ९८१९९७२५११
e-mail : deodhardilip@yahoo.com

**मानद लेखा परीक्षक**
**किरण अनंत देवधर** (कु. वृ. पान. १६२)
१०, वेदवती सोसायटी, स्वामी विवेकानंद मार्ग,
संजीवन हॉस्पिटलसमोर, अंधेरी (पूर्व) मोबाइल :९८२०३३५०९३

।। ॐ श्री केशवराज प्रसन्न।।

# वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने देवधर दीक्षित ढमढेरे कुलबंधूंना आवाहन

एक विशेष आनंदाची बातमी म्हणजे आपल्या मंडळाचे यंदाचे वार्षिक स्नेहसंमेलन रविवार दि.२४ जानेवारी २०१५ रोजी समाज मंदिर हॉल, टिळकनगर, डोंबिवली, पूर्व येथे करण्याचे योजले आहे. मागील महिन्यात देवधर कुलबन्धूंच्या एकत्रिकरणासाठी घेतलेल्या सभांमध्ये उत्साहवर्धक उपस्थिती होती. हे संमेलन १००% यशस्वी करण्यासाठी आपण सहभागी होणारच आहात याची आम्हाला खात्री आहे. तसेच आपण संबंधित कुळातील व्यक्तिंना या संमेलनात सहभागी होण्यास प्रोत्साहीत करावे.

स्नेहसंमेलनात होणारे दोन विशेष कार्यक्रम म्हणजे पंचाहत्तरीतील वरिष्ठांचा सत्कार आणि गुणवंतांचा कौतुकसमारंभ.

यावर्षी महाराष्ट्राच्या इतर शहरातील आपल्या कुलबंधूंना या निमित्ताने आपण आग्रहपूर्वक बोलवणार आहोत. यासाठी आपण ११० घरी या आठवड्यात फोनवर संपर्क केला आहे. आपणसुद्धा आपल्या नात्यातील कुलबंधूंना या वर्षी संमेलनासाठी आवश्यक बोलवावे. या निमित्ताने प्रसिद्ध होणाऱ्या स्मरणिकेमध्ये आपले योगदान असावे. त्यासाठी प्रवासवर्णनपर लेख, कविता, विशेष कर्तुत्ववान व्यक्तिंचा परिचय इ. प्रकारचे लेखन (विषयाचे बंधन नाही. शब्द मर्यादा ५०० पर्यंत) खालील पत्यावर ३०.१२.२०१५ पूर्वी पाठवावे. जाहिराती मिळविण्याचा प्रयत्न व्हावा.

जाहिरातीचे दर आतील पूर्ण पान १००० , अर्ध पान ६००, पाव पान ३०० मागील पूर्ण पान ३०००. पृष्ठप्रायोजकत्व पाव पान २५० व अर्ध पान ५००. चेक्स खालील पत्यावर १०.०१.२०१६ पूर्वी पाठवावे.

स्नेहसंमेलनाच्या दिवशीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात आपली कला सादर करण्यासाठी नावे द्यावीत.

देवधर दीक्षित ढमढेरे कुळाच्या हितासाठी व हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी आपणास काही योजना वा सूचना करायच्या असतील तर जरूर कळवाव्यात.

संमेलनाचे नोंदणी शुल्क रुपये शंभर (१००/-) आपण येणार वा न येणार याची पूर्वकल्पना १८.०१.२०१५ पूर्वी दिल्यास आपल्या सगळ्यांच्याच हिताचे होईल. अनावश्यक खर्च वाचेल.

बाहेरगावाहून आदल्या दिवशी जे कुलबंधू येणार असतील त्यांनी आगाऊ कळवल्यास त्यांची राहण्याची सोय होऊ शकेल.

आजीव सभासदत्वासाठी वर्गणी रु २००/- आहे. कृपया कुलवृत्तांतासाठी वाटचालमधील फॉर्म भरून संमेलनाला आलात तर मंडळाच्या कामात हातभार लागल्याचे समाधान मिळेल.

खालील डोंबिवलीकरांशी संपर्क करावा.

नरेश दीक्षित ९८२०४६७७४२, २४८८७३६
सदानंद देवधर ९८१९५०२३३४, २४८२२१४
सुरेश देवधर ९३२४७९१५३५, २४४९६२२
अनंत देवधर ९८२०२५१६२, २४४१७७५
अविनाश देवधर ९२२४२६४९६९, २४४५२६२

स्मरणिका व स्नेहसंमेलनाच्या साठी संपर्क करावयाचा पत्ता :-

अविनाश देवधर
००२, लक्ष्मी विनायक सोसा. मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली ,पाथर्ली, डोंबिवली पूर्व,
पिन - ४२१२०१.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

# वाटचालचे आभार!

**- सौ.अश्विनी दिनकर करंदीकर**
ग्रँटरोड.(पश्चिम), मुंबई- ४००००७
फोन नं. ०२२ - २३८९८४७७.

मार्च २०१५ च्या वाटचाल अंकात , कार्यवाह सौ. सरिता मुकुंद देवधर यांनी श्री अविनाश दिवाकर देवधर, डोंबिवली यांचे 'आयुर्वेद व आपण' यावरील मांडलेले उद्‍बोधक विचार यांचा उल्लेख केला होता. ते वाचून सौ. सरिता देवधरांकडून त्यांचा फोन नंबर मिळवून, त्यांच्याशी संपर्क साधला.

बोलता बोलता ते गुडघेदुखीवर व डोळ्यांसाठी औषध तयार करतात असे समजले. मी श्री. करंदीकरांसाठी गुडघेदुखीवर औषध मागविले व माझ्यासाठी डोळे सुकतात, खुपतात यावरही औषध देण्यासाठी सांगितले. त्यांनी गुडघेदुखी व डोळ्यांना बाहेरून लावण्यासाठी औषध पाठविले.

एके दिवशी श्री. करंदीकर पुस्तक मोठ्यानी वाचत असतांना, ओळ वर-खाली होऊन वाचनात व्यत्यय येतोय असे जाणवले. असे वारंवार होत होते हे माझ्या लक्षात आले. डोळे तपासून घेतले. तेव्हा डॉक्टरांनी ''मोतीबिंदू दोन्ही डोळ्यात तयार होत आहे. सहा महिन्यांनंतर दोन्ही डोळ्यांचे ऑपरेशन करावे लागेल.'' असे सांगितले. हे ऐकताच श्री. करंदीकर घाबरले.

सहजच त्यांनी दादरच्या वहिनीला ही गोष्ट सांगितली. त्यावर वहिनी म्हणाली,''त्यांच्या चाळीताल मैत्रिणीला असेच सांगितले होते. परंतु पारल्यातील एका नेत्रतज्ज्ञाने डोळ्यात घालायचे औषध व गोळ्या देऊन त्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन टाळले.''

२९ मे २०१५ ला आमचे अमेरिकेत जाण्याचे निश्चित झाले होते. अमेरिकेहून ऑक्टोबरला परत आल्यावर, पारल्याच्या डॉक्टरांकडे जाण्याचे ठरविले होते. अमेरिकेत नेण्यासाठी श्री. अविनाश देवधरांकडून जास्तीची औषध मागविली. त्यांत डोळ्यांचे औषध होते. अमेरिकेत गेल्यावर मोतीबिंदू वाढू नये असे सारखे वाटत होते.

एक विचार मनात आला. जर औषधाने मोतीबिंदू ऑपरेशन टळू शकते, तर मला दिलेल्या डोळ्यांचे औषध यांनी वापरावे का? मी त्यांना मला दिलेले डोळ्यांचे औषध बाहेरून लावण्यास सांगितले. काही दिवसांनंतर यांच्या डोळ्यांतून, नाकातून पाणी येऊ बागले. काही वेळेला डोळ्यांतून चिकट पदार्थ व कणकण बाहेर येत होते. गरम पाण्यात मऊ फडके भिजवून डोळे स्वच्छ करावे लागायचे. दोन्ही डोळ्यांत यांना फरक जाणवू लागला.

ऑक्टोबरला मुंबईत आल्यावर नाना चौकातील विख्यात नेत्रतज्ज्ञांकडून डोळे तपासून घेतले. त्यांनी औषध न घालता बऱ्याच मशीनद्वारे व स्वत: डोळे तपासले. ह्यांना रुग्णाची माहिती चष्म्याशिवाय व्यवस्थित लिहिता आली. नेत्रतज्ज्ञानी मोतीबिंदू नसल्याचा निर्वाळा दिला व चष्म्याचा नवीन नंबर देऊन एक वर्षांनी येण्यास सांगितले. या वयात नजर चांगली असल्याचे सांगितले.

मुलाचा यावर विश्वास बसेना. त्यांनी सेकंड ओपिनियन घेण्यास सुचविले. त्याप्रमाणे गिरगांवातील दुसऱ्या नेत्रतज्ज्ञांकडे जाऊन डोळे

(..... पान ५ वर

# 'आपला भारत' वर प्रश्नमंजूषा

पुणे : भारत विकास परिषद आणि सुभाषनगर परिसर ज्येष्ठ नागरिक संघ यांच्यातर्फे 'आपला भारत' या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा सुभाषनगरमधील प्रमोद महाजन क्रीडा संकुलमध्ये आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १२८ पेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिकांनी भाग घेतला. सर्व नोंदणी केलेल्या सभासदांना 'भारत को जानो' हे संदर्भ पुस्तक भेट देण्यात आले. संस्कृती, इतिहास, राजकारण, संविधान, भूगोल, अर्थव्यवस्था, साहित्य, क्रीडा, चालू घडामोडी अशा विषयांवर आधारित ही प्रश्नमंजुषा होती. या वेळी झालेल्या वेगवेगळ्या फेऱ्यांमधून सिंहगड रोड ज्येष्ठ नागरिक संघाच्या ज्योती आपटे आणि वंदना गुर्जर यांनी पहिला क्रमांक पटकविला.

भुसारी कॉलनीतील सवंगडी ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रभाकर चौधरी आणि रत्नाकर रनाळकर यांनी द्वितीय तर कात्रज येथील इच्छापूर्ती ज्येष्ठ नागरिक संघाचे श्रीकृष्ण बहादरपूरकर आणि दत्तात्रय दंडगे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. या वेळी प्रसिद्ध चित्रकार शि. द. फडणीस, श्रेयस हॉटेलचे संचालक दत्ता चितळे, ॲड. शरद चंद्रचूड, अनिरुद्ध तोडकर, कल्पना बेंगरुत, मधुसूदन देवधर आणि दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**महाराष्ट्र टाइम्स, पुणे च्या ३१/१०/२०१५ च्या आवृत्तीवरून साभार**

---

पान १ वरून ....)

झाडास टेकून बसला. त्याला झोप लागली. झोपेतील स्वप्नांत त्याला विक्रीमधून खूप फायदा झाल्याचे दिसले, मग त्याने घर घेतले. लग्न केले. बायको ठीक होती. पण एकदा तिने नवऱ्याचे म्हणजे शेखचिल्लीची आज्ञा पाळली नाही. म्हणून त्याने तिला लाथ मारली. पण प्रत्यक्षांत ती लय त्याच्या काच सामानास लागली व सर्व सामान फुटून गेले. त्याला जाग आली. समोर सामानाचा चुराडा पाहून त्यांने कपाळावर हात मारला. 'मुंगेरीलाल के हसीन सपने' ही मालिका अशीच मनोरंजक होती.

स्वप्ने जरूर पाहा. ते वास्तवात आणण्यासाठी झटा. प्रगती आपली वाट पाहत आहे.

**– पु. गो. देवधर**

पान ४ वरून ....)

तपासले. त्यांनी औषधे घालून डोळे तपासणी केली. त्यांनीही मोतीबिंदू नसल्याचे खात्रीलायक सांगितले. त्यांनीही दृष्टी चांगली असल्याचे सांगितले. तत्क्षणी ह्यांना श्री. अविनाश देवधरांची आठवण झाली.

'मोतीबिंदू ऑपरेशन' टळणे ही श्री. अविनाश देवधरांच्या औषधाची किमया होती. त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच.

त्यापुढे जाऊन, वाटचालमुळे आम्हाला हे समजले. त्याकरितां वाटचालचे मन:पूर्वक आभार व देवधर मंडळाचेही आभार.

## ❊ आपल्या परदेशस्थ कुलबंधु-भगिनींसाठी ❊

मंडळाचे मुखपत्र असलेले आपले त्रैमासिक 'आपली आहे प्रगतीची वाटचाल हे आपल्या www.deodharmandal.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# काळरात्र चंद्रताल येथील

**– विजय गंगाधर देवधर** (पुणे)

त्या रात्रीची आठवण झाली की आजही अंगावर काटा उभा राहतो. जुलै १९८३ मनाली-चंद्रताल बारालचा - जिस्पा - मनाली. अशी साहस सहल पुण्याहून निघाली होती. साहस सहलीत आम्ही एकूण छत्तीस जण होतो. मनाली रोहतांग पास असा बस प्रवास करून आमची तुकडी चिक्का या ठिकाणी उतरली. चिक्काची उंची समुद्रसपाटीपासून ९७०० फूट इतकी आहे. सोबत तंबू आणले होते ते ठोकून चिक्का या ठिकाणी पहिला मुक्काम झाला. आता आमचा प्रवास चिक्का ते छत्रू ते छोटा दरा (उंची ११००० फूट अंतर १६ किलोमीटर) छोटा दरा ते बातल ( उंची १३०० फूट अंतर १५ किलोमीटर) असा तीन दिवसात पूर्ण झाला. आता इथून पुढचा प्रवास मनुष्यवस्ती पासून दूर असा होता.

पुण्याहून निघतांना सर्व जणांनी बरोबर खाण्याचे पदार्थ - अनेक प्रकारचे लाडू, चिवडा, करंज्या वगैरे भरपूर घेतले होते. त्याचे ओझे प्रत्येकाजवळ असल्याने प्रत्येकजण आपले ओझे कमी करण्यासाठी आपल्याकडील पदार्थ सर्वांना देत होता. चवथ्या दिवशी सकाळी उठून आमचा बातल ते चंद्रताल असा प्रवास करून मुक्काम चंद्रताल या ठिकाणी करावयाचा होता. चार दिवसांच्या पायपीटीने आता ओझ्याचा आणि विरळ हवेचा सराव झाला होता. बातल ते चंद्रताल प्रवास चढणीचा होता. अंतर होते १७ किलोमीटर आणि उंची गाठावयाची होती १४१०० फूट. अर्थात हिमालयातील चाल म्हणजे सतत चढ आणि उतार अशीच असते. आम्ही सर्वजण तीनच्या सुमारास चंद्रताल येथे पोहोचलो. वाटेत फक्त एक मेंढपाळांचा जथ्था भेटला होता. चंद्रताल म्हणजे नितळपाण्याचे सरोवर, सर्वबाजूंनी डोंगरांनी वेढलेले मध्ये बशीसारखे पाणी. पाणी अतिशय थंड आणि स्फटिकासारखे स्वच्छ की पाण्याचा तळ दिसत होता. सर्वजणांनी आपले तंबू ठोकून बिछाने लावले. स्टोव्ह पेटले आणि चहाचे आधण स्टोव्हवर चढले..... गप्पा मारत चहापान झाले व लगेचच रात्रीच्या जेवणाच्या तयारीस लागलो बेत होता पिठलेभाताचा.

इतक्यात आमचे सर्वांचे काका जय हो हातात मग घेऊन येतांना दिसले. काय काका, काय झाले ? अशी विचारणा झाली.पोट बिघडले बेसनाचे लाडू बाधले असावेत अशी शंका व्यक्त केली. थोडासा गरम चहा घ्या बरे वाचेल. काकांनी चहा घेतला. त्यानंतरच्या तासाभरात काकांच्या आठ ते दहा फेऱ्या झाल्या आता काकांच्या चेहऱ्यावर थकवा दिसत होता. प्रसंग बाका होता. आमच्या प्रथमोपचार पेटीतील औषध काढली. त्यातील जुलाब बंद होण्याच्या गोळ्या दिल्या. त्याचबरोबर गरम पाण्यात इलेक्ट्रॉल घालून पिण्यास दिले. सात वाजण्याच्या सुमारास स्वयंपाक तयार झाला होता. परंतु सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे चिंतेचे सावट होते. काकांच्या फेऱ्या चालूच होत्या आणि दर फेरी गणिक थकवा वाढत होता. आठच्या सुमारास काकांना ग्लानी येऊ लागली . नेहमी आनंदी असणारे काका निरवानिरवीची भाषा करू लागले. आमच्या तोंडचे पाणी पळाले होते. प्रसंग अतिशय खडतर होता. आता सारा भार देवावर होता. मनुष्यवस्तीपासून अती दूर, कोणतीही वैद्यकीय सोय जवळपास उपलब्ध नाही अशा स्थितीत आल्या प्रसंगास धैर्याने तोंड देणे आवश्यक होते. आबांनी (महाजन सरांनी) सर्वांना धीर दिला. प्रथम काकांची झोपण्याची सोय एका तंबूत केली. जुलाबाचे प्रमाण कमी झाले होते. परंतु अतिशय थकवा आला होता. त्यांना एक स्लिपिंग बॅगेत झोपवले

सोबत मी, सुधीर आणि एक जण तंबूत जागत बसणार होतो. काकांना जागते ठेवणे आणि डिहायड्रेशन होऊ नये म्हणून सतत इलेक्ट्रॉलचे पाणी तोंडाने देणे आवश्यक होते. बरोबरच्या थर्मासमध्ये गरम पाणी भरले, सर्व इलेक्ट्रॉलची पाकिटं गोळा केली. पाण्यासाठी मग, चमचा अशी तयारी करून तंबूत बसलो. काकांना शेकण्यासाठी गरम पाण्याची पिशवी दिली होती. काकांनी मला त्यांचे डोके मांडीवर घेण्यास सांगितले. त्यांची निरवानिरवीची बडबड चालू होती. मनात एक प्रकारची भीती असूनही ती न दाखवता काकांना धीर देण्याचे काम, तसेच त्यांना जागे ठेवण्याचे काम चालू होते. पूर्वीच्या ट्रेकमधील गमतीदार प्रसंग सांगून मनावरील ताण कमी करण्याचा व प्रसंगातील गंभीरता कमी करण्याचा प्रयत्न चालू होता. रात्र हळूहळू चढत होती. मधूनच आमचे इतर ट्रेकर तंबूकडे येऊन आता तब्येत कशी आहे अशी खुणेने चौकशी करीत होते. परमेश्वराचा धावा करीत आम्ही काकांना एक एक चमचा इलेक्ट्रॉलचे पाणी पाजीत होतो. आमच्या डोळ्यावर झोपेची झापड येत होती परंतु सतत बोलून झोप घालविण्याचा प्रयत्न चालू होता. बोलता बोलता काकांना झोप लागली. झोपेतच ते कांही बोलत होते व दिलेले पाणी निमूटपणे घेत होते. अखेर एकदाची ती रात्र संपली. आता उजाडले होते. काकांचे डोके माझ्या मांडीवर असल्यामुळे मांडी आखडली होती. मांडीची हालचाल होताच काकांना जाग आली. काकांनी हळूच डोळे किलकिले करीत पाहिले आणि त्यांनी मला चिमटा काढण्यास सांगितले. चिमटा काढताच काळ झोपेतून जाग आली असे काका म्हणाले. त्यांचा चेहरा आता बराच टवटवीत दिसत होता. जे घडले ते रात्रीचे एक स्वप्न असावे असे वाटले. काकांची तब्येत छान असल्याचे वृत्त कँप मध्ये पसरल्याने आनंदाचे वातावरण पसरले. कँपची आवराआवर करून आता परत मनालीस जाण्याचा बेत आबांनी जाहीर केला. ट्रेकमधील पुढील टप्पे अवघड आणि चढावाचे आल्याने हा निर्णय घेतला असल्याचे आबांनी सांगितले. रोजच्याप्रमाणे प्रार्थनेसाठी आम्ही सर्वजण गोल करून उभे राहिलो. काकाही प्रार्थनेसाठी उभे राहिले. सर्वांनी मोठ्या श्रद्धेने प्रार्थना पूर्ण केली. कालच्या कठीण प्रसंगातून बाहेर पडण्यास परमेश्वराचे साहाय्य मिळाल्याचे प्रार्थनेत दिसून येत होते. आठचे सुमारास आमचा चंद्रताल ते बातल असा परतीचा प्रवास सुरू झाला. काकांना घोड्यावर बसण्याचा आग्रह झाला परंतु त्यांनी आमचे बरोबर पायी येण्याचा हट्ट धरला. त्यांचे सामान घोड्यावर टाकून काका आमच्या सोबत बातल पर्यंत हळूहळू आले. काकांचे हिमालयातील ट्रेक यानंतरही चालू राहिले. ले-लडाख त्यांनी आपल्या मुलाबरोबर LML स्कूटरवरून पूर्ण केला आहे. सर्वांना ट्रेक रद्द केल्याचे वाईट वाटलं पण कालच्या जीवघेण्या प्रसंगातून काका सुखरूप वाचल्याचा आनंद त्यांना झाला होता. ट्रेक काय परत कधीही करता येईल असा विचार त्यांनी व्यक्त केला. मनाली चंद्रताल विषय निघतो तेंव्हा हा प्रसंग डोळ्यासमोर येतो.

**– विजय देवधर**
गौरीशंकर, १४ गोवर्धन सोसायटी,
वीर सावरकरनगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी २४२६४०३२, भ्रमणभाष
८३०८८०५८९५
ईमेल deodharvg@yahoo.co.in

# कुलवृत्तांताच्या नवीन आवृत्तीसाठी पुरवणी माहिती

(टीप : विवाह झालेल्या मुला/मुलींसाठी वेगळा फॉर्म वापरावा)

मजकूर पाठवितांना तो या क्रमाने येणे अपेक्षित आहे. या फॉर्मची झेरॉक्स काढून त्यावर भरून पाठविणे नाही.

<u>कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिचा वेगळा फॉर्म पाठवावा.</u>


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कुलवृत्तांत पान नं.<br>घराणे | |
| १) नांव | स्वत:चे | वडिलांचे/पतीचे नांव | आडनांव | |
| माहेरचे नांव (महिलांसाठी) | स्वत:चे | वडिलांचे | आडनांव | |
| २) वडिलांचे नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव | |
| ३) पती/पत्नीचे नांव | नांव | वडिलांचे | आडनांव | |
| ४) पती/पत्नीच्या वडिलांचे | नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव |
| ५) पूर्ण पत्ता : घर नं. | इमारत | रस्ता | | |
| तालुका | जिल्हा | राज्य | | |
| पिन | मोबाईल | | | |
| ६) फोन नं. कार्यालय | | | घर | |
| ७) जन्मदिनांक (........./........../.............) ठिकाण (गांव) | | | शहर | |
| राज्य | | पिन | देश | |
| ८) विवाहाची तारीख (........../............/...............) | | | | |
| ९) शिक्षण (दहावी / बारावी / पदवी वगैरे) | | | विद्यापीठ | |
| १०) व्यवसाय | | | | |
| ११) काही महत्त्वाच्या उपलब्धी (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १२) इतर खास लिहिण्यासारखे (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १३) अपत्य (मुलगा/मुलगी) नांव जन्म दिनांक (........../.........../...............) | | | | |

फॉर्म पाठविण्याचा पत्ता :

श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित (कु.वृ.पान ७२५)

ब/९, ॐ भैरवी सोसायटी, सम्राट हॉटेल बिल्डिंग, पं. दीनदयाळ मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२, जि. ठाणे (महाराष्ट्र) फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२ email : nareshdixit1949@gmail.com


In wonder I Landscapes



**Scaffolding 5, 2013, Pastel on Paper, 22? x 30?.**
**Construction Work**

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आतिथी संपादक श्री. आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.